


# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २९१ वा ❑ मंगळवार दि.२० जानेवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## मुंबईचा महापौर कोण होणार?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

नुकत्याच संपन्न झालेल्या महानगर पालिकेच्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही. भाजप शिंदे यांच्या युतीला बहुमत मिळाले असले तरी मुंबईच्या महापौर पदावरून उभय पक्षातील मतभेद समोर येत आहे.सर्वात मोठा पक्ष म्हणून भाजप मुंबईचं महापौर स्वतः  जवळ ठेवू इच्छिते. पण त्यासाठी भाजपला शिंदे गटाच्या मदतीची गरज आहे.नेमका याचा फायदा घेत शिंदे यांनी अडीच अडीच वर्षाचा प्रस्ताव ठेवल्याची चर्चा आहे. त्यामुळे मुंबईचा महापौर कोणाचा होणार,? याविषयी कमालीची गुप्तता व रस्सीखेच बघायला मिळत आहे.मुंबईत महापौरपदाच्या शर्यतीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या फोडाफोडीच्या राजकारणास शह देण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून, उद्धव ठाकरे गट आणि भाजप यांच्यात पडद्याआड चर्चा सुरु झाल्याचे समजते.

मुंबईत भाजप तसेच शिंदे यांच्या पक्षाला ११८ जागा मिळाल्या आहेत. बहुमतासाठी ११४ जागांची गरज आहे. भाजपकडे ८९ सदस्य आहेत. आकड्यांच्या गणितात शिंदे यांच्या २९ नगरसेवकांना महत्त्व आले. त्यातच शिंदे यांनी त्यांच्या पक्षाच्या नगरसेवकांना पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवले आहे.

कल्याण डोंबिवली महापालिकेची निवडणूक एकत्र लढवून देखील शिंदे यांची शिवसेना आणि भाजपमध्ये सत्तास्थापनेसाठी स्पर्धा सुरु झाली आहे. याठिकाणी ५४ लागा लढवून भाजपने ५१ जागांवर विजय मिळविला. तर शिंदे सेनेने येथे ६८ जागा लढवून ५४ जागांवर यश मिळवले. येथे उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे ११ नगरसेवक निवडून आले आहेत. पालिकेत बहुमतासाठी ६३ जागांची आवश्यकता असून महापौरपदाचे गणित जमविण्यासाठी शिंदे यांचे पुत्र डॉ.श्रीकांत यांनी हालचाली सुरु केल्या आहेत.

दरम्यान,मुंबईत एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाच्या १२ नगरसेवकांना फोडण्याची तयारी सुरू केल्याचे वृत्त असून, त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधला, त्यानंतर पडद्यामागील हालचालींना वेग आला.

शिंदेंना ना स्थायी ना बेस्ट समिती

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांच्यासंदर्भात पक्षश्रेष्टीपुढे स्पष्ट भूमिका घेतली असून, शिंदे गटास महापौरपद, स्थायी समिती वा 'बेस्ट' यातील काही देण्यास विरोध दर्शवला आहे. शिंदे यांच्या पाठिंब्याशिवायही मुंबई महापालिकेत भाजप सर्व राजकीय आव्हानांस तोंड देऊ शकतो हे स्पष्ट व्हावे यासाठीच उद्धव ठाकरे गट आणि भाजप यांच्यात पडद्यामागे समटाची बातचीत सुरु असल्याचे कळते.त्यामुळे मुंबईचा महापौर कोण होणार, याबाबत अजूनही चित्र स्पष्ट  नाही.

मुंबई महापालिकेच्या महापौरपदावरून विविध दावे केले जात असतानाच आता उद्धव ठाकरे यांना धक्का देणारी बातमी पुढे येत आहे. नुकताच ठाकरे गटाचे नवनिर्वाचित नगरसेवक नॉट रिचेबल झाल्याची माहिती आली. हा मोठा धक्का म्हणावा लागेल. देवाची इच्छा असेल तर आमचा महापौर होऊ शकतो, असे उद्धव ठाकरेंनी स्पष्ट म्हटले. मात्र,आता उद्धव ठाकरे यांचेच नगरसेवक नॉच रिचेबल झाले आहेत. उद्धव ठाकरे यांचे काही नगरसेवक एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याची माहिती समोर येत आहे.मुंबईच्या महानगरपालिका निवडणुकीत महायुतीचा दणदणीत विजय झाला आहे.  एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि भाजपाने एकत्र येत पूर्ण ताकदीने निवडणूक लढवली होती. काहीही झालं तरी ही निवडणूक जिंकायची, असा निश्चयच महायुतीच्या या दोन्ही घटकपक्षांनी केला होता. दुसरीकडे मनसे आणि उद्धव ठाकरे यांनीही ऐतिहासिक युती करून मराठी अस्मितेच्या माध्यमातून वातावरण तापवले होते. परंतु आता मुंबईत महायुतीची सरशी झालेली असून महापौर निवडीच्या प्रक्रियेला वेग आला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपले सर्व नगरसेवक ताज लँड्स या पंचतारांकित हॉटेलमध्ये हलवले आहेत. त्यामुळेच मुंबईचा नवा महापौर कोण होणार, याबाबतच सस्पेन्स वाढला आहे.

# संस्कृती आणि विज्ञान यांच्या समन्वयातून देश परमवैभवाच्या शिखरावर – प्रा डॉ वि ल धारूरकर

ज्योतिर्मय साहित्य

पुणे : संस्कृती आणि विज्ञान यांच्या समन्वयातून देश परम वैभवाच्या शिखरावर पोहोचेल हे संघाचे स्वप्न साकार होण्याच्या मार्गावर आहे. तेव्हा २१ व्या शतकात प्रगत नवभारताची जडणघडण करण्यासाठी प्रत्येक स्वयंसेवकाने यथायोग्य योगदान दिले पाहिजे असे मत प्रसिद्ध विचारवंत आणि माजी कुलगुरु डॉ वि ल धारूरकर यांनी व्यक्त केले.

ते बावधन सावरकर प्रभात शाखेत मकर संक्रमण उत्सव प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी अध्यक्षस्थानी श्री अनिल फौजदार हे होते. प्रारंभी श्रीनिवास तिग्रे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला श्री दीक्षित यांनी स्वामी विवेकानंदांच्या अमृत विचारांचा परामर्ष घेतला.

ज्येष्ठ कार्यकर्ते श्री गणेश उर्फ बाबुराव गोखले यांच्या हस्ते बावधन सावरकर प्रभात शाखेची पुस्तिका प्रकाशित करण्यात आली. या कार्यक्रमाचे संचालन श्री दाते यांनी केले




आपल्या भाषणात डॉ वि ल धारूरकर पुढे म्हणाले डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार यांनी १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. हिंदू समाजातील निद्रिस्त चैतन्य जागृत करून राष्ट्रपुरुषाला चैतन्यदायी बनविण्यासाठी संघाची स्थापना करण्यात आली. पुढे श्री गुरुजींनी आयुष्यभर केलेल्या देशाच्या ६५ परिक्रमातून संघ देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविला आणि वनवासी कल्याण विद्यार्थी संघटन मजदूर संघटन अशा अनेक क्षेत्रात नव्या संघटना स्थापन केल्या. बाळासाहेब देवरसांनी सामाजिक समरसतेचा सिद्धांत सांगितला आणि तो कृतीमध्ये आणला के. सुदर्शन यांनी संघात नवी संघटन पद्धती आणली आणि युवकांमध्ये चैतन्य आणले. प्रा. राजेंद्र सिंह यांनी विज्ञान अनिष्ट दृष्टी संघांना दिली आणि नवभारताच्या उभारण्याचा मार्ग दाखविला. पू. मोहनजी भागवत यांनी नव्या युगात संघाला परिवर्तनाच्या नव्या दिशा स्पष्ट केल्या. सामाजिक परिवर्तन आर्थिक परिवर्तन आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा नवा मार्ग त्यांनी दाखवला. संघाच्या समर्थनातून आज भाजपचा अश्व दिग्विजयाच्या मार्गावर आहे अशावेळी संस्कृती आणि विज्ञान यात समन्वयाची नितांत गरज आहे, स्वामी विवेकानंदांचे तेच खरे स्वप्न होते त्यामुळे भविष्यकाळात भारताला अध्यायावत प्रगत आणि आधुनिक स्वरूप घेण्यासाठी संघाच्या प्रत्येक स्वयंसेवकाला कधीबद्ध व्हावे लागेल.

याप्रसंगी शेवटी जोशी यांनी आभार मानले. आनंद दाते, राजीव भोपळे, विद्याधर देशपांडे तसेच विद्यासागर, श्री दीक्षित, गरवारे व्यवस्थापक तसेच श्री स्वरूप सिंग, राम नारायण अग्रवाल इत्यादी बावधन मधील जेष्ठ नागरिक उपस्थित होते. माजी नगरसेवक गोरख दगडे पाटील यांनी या कार्यक्रमाच्या संयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. बावधन नगरीतील गृह संपर्क मोहीम यशस्वी करण्यासाठी झालेल्या एक दिवसाच्या शिबिरात श्री मधुकरराव पोहनेरकर यांनी उपयुक्त मार्गदर्शन केले बावधन परिसरात गृह संपर्क मोहीम यशस्वी करण्यासाठी कार्यकर्ते विशेष परिश्रम घेत आहेत.

# मराठी – सही रे सही ..!

ज्योतिर्मय साहित्य

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे च्या कोषाध्यक्ष पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या विनोद कुलकर्णी यांच्या अर्जावर प्रसिध्द चित्रकार आणि विशेषतः पुस्तकाचे मर्म नेमकेपणाने मुखपृष्टातून व्यक्त करणारे चित्रकार रविमुकुल (विश्वास मुरलीधर कुलकर्णी) सूचक म्हणून सही करण्यासाठी आले होते. त्यांनी सूचक म्हणून सही केली आणि मी म्हंटले.... वाह, काय मस्त मराठीतील सही आहे. यावर त्यांनी त्यांच्या आयुष्यामध्ये घडलेली घटना सांगितली. रविमुकुल म्हणाले... त्याची गंमत अशी झाली, बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसा. लि. च्या पुणे येथील प्रभात रोड शाखेच्या शेजारील हॉटेलमध्ये माझ्या एका मित्राबरोबर गप्पा मारण्यासाठी त्याने बोलविले होते. मी पोहोचलो आणि तोपर्यंत त्याचा फोन आला कि, मला येण्यासाठी अजून १५-२० मिनीटे लागतील. मी म्हंटले आता १५-२० मिनिटे काय करायचे? तेव्हड्यात मला बुलढाणा अर्बन क्रेडीट सोसायटीचा बॅनर दिसला. त्यांनी मराठी भाषेची सही-स्पर्धा त्यांच्या संस्थेच्या वरच्या मजल्यावर आयोजित केली होती. टाइमपास करण्यासाठी मी त्याठिकाणी गेलो आणि माझी नेहमीची मराठीत करीत असलेली सही स्पर्धेसाठी ठोकून आला. मी हे विसरूनही गेलो होतो. अचानक मला १५ दिवसांनी घरी पत्र आले. तुमच्या सहीसाठी तुम्हाला चार हजार रुपयाचे पारितोषिक मिळाले आहे. १५-२० मिनिटे माझा मित्र उशीरा येणार असल्याने मला अचानक माझ्या सुंदर मराठी सहीसाठी मिळालेली ही भेट माझ्या आयुष्यभर लक्षात रहाण्यासारखी आहे. माझा मित्र १५-२० मिनिटे उशीरा आला पण या अनुभवाने मी समृद्ध झालो. माझी सही बघून प्रसिध्द लेखिका विजया राजाध्यक्ष यांची सून आणि न्यायमूर्ती नरेंद्र चपळगांवकर यांची मुलगी सायली राजाध्यक्ष मला म्हणाल्या कि, मला तुमची मराठीतील सही प्रचंड आवडतेय. माझी सही जरी मराठीत असली तरी माझ्या नावाचा इंग्रजी लोगो माझे सर, प्रसिद्ध कॅलिग्राफर प्राध्यापक बाबू उड्डपी यांनी मी विद्यार्थी असतानाच करून दिला होता. तोच मी त्यांचा आशिर्वाद म्हणून माझ्या व्यवसायासाठी कायम




ठेवला आहे. मराठी साहित्यिकांमध्ये मला आवडलेल्या मराठीतील उत्तम सह्या म्हणजे पु.ल. देशपांडे,  व पु. काळे, व्यंकटेश माडगूळकर आणि श्रीनिवास कुलकर्णी यांच्या.

मी हे जेव्हा ऐकले तेव्हा मला मी करीत असलेल्या मराठीतील सहीची आठवण झाली. मी माझ्या बँक व्यवहारासाठी व इतर आर्थिक, कायदेशीर व्यवहारासाठी इंग्रजीत सही करतो.पण विशेषतः माझ्या लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्थेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या सर्टिफिकेटसवर तसेच ग्रंथमहोत्सवात सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि इतर ठिकाणच्या कार्यक्रमाच्या सर्टिफिकेटस्वर मराठीतूनच सही करतो. एव्हढेच नव्हे तर माझ्या सहकारी मित्रांना, शिक्षकांना व इतरांनाही मराठीतूनच सही करा असा प्रेमाचा सल्ला देतो. मला अजून आठवतेय मी १९८५ साली पहिल्यांदा सातारा नगरपरिषदेत नगरसेवक म्हणून निवडून आलो. साताऱ्यातील सामाजिक कार्यात असणारे एक प्रतिष्ठीत कायम मराठीत सही करायचे. त्यांच्या कामापेक्षा जास्त त्यांचा लोकांना पोस्ट-कार्ड पाठविण्यावर भर असे आणि त्यावर ते मराठीत सही करीत.त्याकाळात जेंव्हा मी हे बघीतले तेंव्हा माझ्याही लक्षात आले आपण मराठीपण जपले आहेच व या मराठी भाषेने आपल्यामध्ये विचारांची समृद्धताही दिवसें दिवस वृध्दींगत होत आहे. आपणही मराठीतच सही करावी. तसेच आपण केलेली सही कालांतराने ती व्यक्ती जेंव्हा त्याला मिळालेले सर्टिफिकेट बघेल तेंव्हा आपल्या नावानिशी असलेल्या सही मुळे त्याला सहजरित्या आपली आठवण होऊ शकते. मला आज कित्येक विद्यार्थी आठवणीने मी त्याकाळात सर्टिफिकेटवर केलेल्या सहीची प्रत दाखवितात तसेच व्हॉटस्ॲपवर पाठवितात. मला मराठीत सही करणा-या व्यक्तींच्या सह्या बघण्याचा आणि प्रतिक्रिया व्यक्त करण्याचा छंदच लागला आहे. मला त्यांनी केलेली मराठीतील सुंदर सही बघून आपणाला अशी का करता येत नाही याबद्दल खंतही वाटते. नुकतीच १९४८ साली जन्मलेल्या व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करीत असलेल्या, बरीच त्यांची ग्रंथसंपदा असलेल्या लेखक प्रा. दिलीप येवलेकर यांची मराठीतील सही माझ्या बघण्यात आली. जी मला भावली.१९९३ साली साताऱ्यात संपन्न झालेल्या ६६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे सर्टिफिकेटवर माझी कोषाध्यक्ष म्हणून तर स्वागताध्यक्ष अभयसिंहराजे भोसले आणि कार्याध्यक्ष शंकर सारडा यांची सही आहे. मी त्यावेळी जनता सहकारी बँक-सातारा येथे संचालक होतो.९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात याच बँकेचे स्टाफ मेंबर जबाबदारीचे काम करीत होते. त्यांनी मला ६६ व्या मराठी साहित्य संमेलनात सहकार्य केल्यामुळे त्याना मिळालेले सर्टिफिकेट आणून दाखविले ज्यावर माझी मराठीत सही आहे. मला ते बघून अत्यानंद झाला.कांचन प्रकाश संगीत यांची खाली दिलेली कविता सहीचे महत्व विशद करते.



शिरीष चिटणीस
सातारा मो. 75888 65051

आयुष्याची वही
भली बुरी पण सही
तीत पाने कोरी गोरी
लिहितो त्यावर
सुख दुःखाच्या गोष्टी
पेरून अनुभूती !
गोष्टीच्या शेवटी
टाकून दिनांक
रेखितो सही शेलाटी
किती सहज
होते गोष्ट सहीची कधी
अवचित सुंदरशी !
अक्षरे  नि वेलांटी
तो नित्य करतो
सही मागुनी सही
भरते कोरी होते त्याची वही
आम्ही त्यातल्या गोष्टी
सदैव पान सुंदर मही !

मातृभाषेत सही करणे हे भाषेच्या शुद्धतेचे आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याचे महत्वाचे साधन आहे. मातृभाषा आपल्या ओळखीचा, विचारांचा आणि भावनांचा आधार असते, त्यामुळे मातृभाषेत सही असणे बौध्दिक विकास आणि संवादाच्या स्पष्टतेसाठी आवश्यक ठरते. मातृभाषेत बोलणे किंवा लिहिणे हे मेंदूच्या संज्ञानात्मक क्षमतांना चालना देते, विशेषतः मुलांच्या शिक्षणात. संशोधन दर्शवते की, मातृभाषेत प्राविण्य असलेली मुले इतर भाषांमध्ये जलद प्रगती करतात. मातृभाषा सामाजिक संवाद, व्यवसाय आणि सार्वजनिक जीवनात आत्मविश्वास वाढवते. ती स्थानिक समुदायाशी दृढ नाळ साधते आणि सर्जनशील अभिव्यक्तीला प्रोत्साहन देते. शिक्षण आणि संवादात मातृभाषेचा अभाव असल्यास संकल्पना समजणे कठीण होते. ज्यामुळे शिक्षणाची गती मंदावते. संशोधन दर्शवते की याने आत्मविश्वास कमी होतो आणि सर्जनशीलता प्रभावीत होते. मराठीत सही करणे आपली सर्जनशीलताही वृद्धिंगत करते.

***










# जात्यावरच्या ओव्या......

हिरव्या झाडाची
सावली गार गार
तिथं करती रवंथ
गायी खंडीभर ||४५६||

हिरव्या झाडाची
दाटगर्गट सावली
काम करून दमता
विसावली माऊली ||४५७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# संक्रांत, मुले आणि केशव काका




ज्योतिर्मय साहित्य

काका – ( मोठ्याने हसत ) अरे, खरं सांगू ? आपले सण सगळ्यांसाठी असतात. सगळ्यांना आनंद देतात. आता तुम्ही तिळगुळ घेऊन आलातच की नाही माझ्याकडे ? मुलांची तर किती मजा असते ? खायला मस्तपैकी गुळाची पोळी, बाजरीची खिचडी, तिळाच्या पाण्याने अंघोळ, वांगी, पावटा, वाटाणा, वाल आदी भाज्यांची केलेली मिश्र भाजी. आजपासूनच पतंग महोत्सवाला सुरुवात होते. मुले पतंग उडवण्याचा आनंद घेतात. गुजरातमध्ये तर हा पतंग महोत्सव फार मोठ्या प्रमाणात असतो. तो पाहण्यासाठी देशविदेशातील लोक येतात.

सुहास – पण काका, पतंग उडवण्याचा आणि या सणाचा काय संबंध ?

काका – छान प्रश्न विचारलास. अरे, मी मघाशीच म्हणालो ना की आता यापुढे दिवस मोठे आणि रात्र लहान होत जाणार. सूर्याचं तेज वाढत जातं. एक प्रकारे ही उन्हाळ्याची सुरुवातच ! आपलंही तेज नको का वाढायला ? तुम्ही मुलं अलीकडे मोकळ्या हवेत आणि स्वच्छ सूर्यप्रकाशात फार कमी जातात. या पतंग उडवण्याच्या निमित्ताने आपण मोकळ्या मैदानात मोकळ्या हवेत जातो. स्वच्छ सूर्यप्रकाश आपल्याला मिळतो. सूर्यप्रकाशात व्हिटॅमिन डी असते हे तर तुम्ही शिकलाच आहात. नुसत्याच मेडिकलच्या दुकानात जाऊन व्हिटॅमिनच्या गोळ्या खाण्यापेक्षा नैसर्गिकरित्या ते मिळवणे हे चांगलं नाही का ? शिवाय खेळातून मनाची एकाग्रता वाढते. शरीर बलवान होण्यास मदत मिळते. इम्युनिटी किंवा रोगप्रतिकारशक्ती म्हणतात ती अशीच वाढवायची असते. पतंग या खेळाची आणखी एक वेगळी बाजू सांगू ?





सुहास – काका, सांगा ना.

काका – बाळांनो, तसे तुम्ही अजून लहान आहात पण तरीही तुम्हाला समजेल असे सांगतो. पतंग आकाशात उंच जातो की नाही ? तो जणू सांगतो की तुमच्या इच्छा, महत्वाकांक्षा, ध्येय असेच उंच ठेवा. स्काय इज द लिमिट. पण त्याचबरोबर पतंगाची दोरी आपल्या हातात असते. त्यातून आपण पतंगावर नियंत्रण ठेवत असतो. तसेच आपल्या इच्छा, भावनांवर सुद्धा नियंत्रण ठेवता आले पाहिजे. ते आपल्याच हाती असते. पतंगाचा आनंद घेता तसा जीवनाचा आनंद घ्या. आपली पतंग कटली म्हणजे कोणी कापली तर आपण ते सहजपणे स्वीकारतो नाही का ? तशीच जीवनातील दुःखे, अप्रिय गोष्टी सहजपणे खिलाडू वृत्तीने स्वीकारा आणि पुढची वाटचाल सुरु ठेवा हेच हा खेळ आपल्याला सांगत नाही का ?

तिघेही – काका, खरंच, इतकं छान या खेळाचं महत्व आम्ही पहिल्यांदाच ऐकलं. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# विमलब्रम्हनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

प्रथम हे सारे द्रुष्य विश्व मनातून नाहीसे झाले पाहिजे. आपल्या देहासकट सर्व स्रुष्टि सत्य नाहीच अशी खात्री झाली म्हणजे ब्रम्हाचा अनुभव घेण्याची पात्रता अंगी येते. त्यानंतर ब्रम्हाचा स्वतः ला साक्षात्कार होतो व जीव ब्रम्ह रूप होऊन जातो.


ज्ञानद्रुष्टी सुक्ष्म असते तर इंद्रियद्रुष्टी स्थूल असते. अर्थात ज्ञानद्रुष्टीने जे ब्रम्हस्वरूप जाणतो ते इंद्रियांना जाणणे शक्य नसते. अंतरंगात ते बरोबर समजते. ब्रम्ह ज्ञान स्वतः प्रमाण असते. म्हणून इंद्रियप्रचीति सतेज आहे किंवा नाही हे ज्याचे त्याला अंतरंगात बरोबर समजते. जाग्रुति,स्वप्न व सुषुप्ति या तीन अज्ञानाच्या अवस्था आहेत. चौथी अवस्था तुर्या ,या अवस्थेत एकीकडे ब्रम्हाचे भान असते तल दुसरीकडे द्रुष्य विश्वाचे भान असते. स्वरूपानुभव येण्यास व्रुत्ति कुठे ठेवावी हे तुर्येमध्ये बरोबर समजते. ती सर्व साक्षिणी अवस्था आहे. देहासकट सर्व द्रयुष्य विश्वाला तुर्येमध्ये वेगळे पणाने पहाता येते.

‘‘मी आत्मा सर्व द्रुष्याचा अतीत आहे, मी केवळ त्याचा साक्षी आहे‘‘ अशी अवस्था असली तरी तिच्यामध्ये साक्षित्वाची सुक्ष्म शक्ति असते,साक्षित्व मावळून ती व्रुत्ती सुध्दा विलीन झाली म्हणजे उन्मनी प्राप्त होते. संपूर्ण व्रुत्तिरहित अवस्था म्हणजे उन्मनी होय.त्या निव्रुत्ति अवस्थेत सर्व जाणतेपण विरते,तेच विज्ञान होय.

प्रथम अज्ञान नाहीसे होऊन। ज्ञान उदय पावते. पुढे ज्ञान नाहींसे होऊन विज्ञान येते. अखेर विज्ञान देखील ब्रम्हात एकरूप होते,मग केवळ शुद्ध व विमलब्रम्ह परब्रम्ह तेवढे शिल्लक उरते. असे हे शाश्वत ब्रम्ह आहे.

श्रीराम जय राम जय जय राम
जय जय रघुवीर समर्थ
विमळब्रम्हनिरूपण नाम समास चौथा समाप्त

# परमेश्वराकडे कर्तेपण देऊन काळजी सोडून द्यावी.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

सर्व कर्तेपण परमात्म्याला देऊन, आपण काळजी करण्याचे अगदी सोडून द्यावे, आणि सदैव समाधानात आणि आनंदात राहावे. जे जे काही घडते आहे ते ते परमात्माच आपल्या हिताकरिता करतो आहे, आणि आपल्याकडून ज्या क्रिया होतात त्या आपण करीत नसून परमात्माच करीत आहे, अशी प्रत्येक गोष्टीमध्ये आणि प्रत्येक क्रियेमध्ये जाणीव आणि भावना ठेवावी. अशी भावना ठेवायला कुठे बिघडते ? त्यात अवघड ते काय आहे ? प्रयत्न अवश्य करावा आणि तो कसून करावा; पण तो परमात्माच सर्व करीत असून, त्यात येणारे यश अगर अपयश हे सर्व आपल्या हितासाठीच आहे, अशी ठाम भावना ठेवली पाहिजे. अशी ठाम भावना ठेवल्यावर काळजीला जागाच कुठे राहिली ? आणि एकदा काळजी गेली म्हणजे आपला आनंद हा स्वयंसिद्ध आहेच आहे ! तो काही दुसऱ्या कुठून मिळवायचा नाही. आनंदाला ही काळजी झाकाळून टाकते. थोडक्यात म्हणायचे झाले तर असे सांगता येईल की, मीपण, म्हणजेच कर्तेपण परमात्म्याला द्यावे, म्हणजे काळजी नाहीशी होते आणि निर्मळ आनंद उरतो, आणि अशा स्थितीत नामस्मरण चालावे. हेच ‘स्वानंदात स्मरण’ होय.

आपले कर्तेपण अपुरे आहे. ते आपल्या स्वाधीन नसून परमात्म्याच्या स्वाधीन आहे. म्हणून सुखदुःखाची बाधा आपल्याला न होता, ती परमात्म्याला झाली पाहिजे ! आपल्या सुखदुःखाचा नाश म्हणजेच आपल्या कर्तेपणाचा नाश; आणि आपल्या कर्तेपणाचा नाश म्हणजेच ‘ भगवंत करतो ’ ही भावना होय. आपले होते कसे ते पाहा : कर्माच्या सुरुवातीला काळजी लागते; कर्म करीत असताना ‘ काय होतंय् कुणाला ठाऊक?’ म्हणून काळजी लागते; आणि कर्म झाल्यावर शेवटी, ‘ अरे, हेच का फळ मिळाले ? ’ म्हणून काळजी लागते; याप्रमाणे, काळजी करणाऱ्या मनुष्याला सुख-समाधान केव्हाच मिळत नाही. काळजी ही वाळवीसारखी आहे; काही खात असताना तर ती दिसत नाही, पण कपडा किंवा पुस्तक खाल्ल्यावर मात्र ती दिसते. त्याचप्रमाणे, काळजी आपली निष्ठा कमी करीत असते; त्या अवस्थेत ती दिसत नाही, परंतु नंतर मात्र ती दिसते. काळजी सोडायची म्हटली तर आजच सुटेल, नाहीतर ती केव्हाच सुटणार नाही. भारतीय युद्धात, भगवंताने जिथे रथ नेऊन उभा करावा तिथे अर्जुनाने बाण मारावे ! अर्जुनाने आपल्या रथाच्या दोऱ्या भगवंताच्या हाती दिल्या, त्याचप्रमाणे आपण आपल्या जीवनाच्या दोऱ्या भगवंताच्या हाती देऊ या. अर्जुनाच्या जागी एखादे बाण मारणारे यंत्र जरी असते तरी काम तेच झाले असते. तसे आपण भगवंताचे यंत्र बनू या. यंत्राला चालविणारी शक्ती आणि यंत्राकडून काम करवून घेणारी शक्ती म्हणजे भगवंत आहे. आपण आपल्या मालकावर पूर्ण विश्वास टाकून त्याच्या नामात राहू या.

आपला देह प्रारब्धावर टाकून, साधकाने मजेत त्याच्या सुखदुःखाकडे पाहावे.



# श्री संत ज्ञानेश्वर
## अभंग व अर्थ

*अभंग २१*

*विज्ञानाचे ज्ञान अज्ञानीं घनवट ।*
*ज्ञानें अज्ञान नीट लाविलें दिसें ॥१॥*
*मी तूं हे मात हरपले दृष्टांत ।*
*हृदयीं हृदयस्थ निजतेजें ॥ध्रु०॥*
*साकार निराकार शून्याशून्य दिठा ।*
*रुपीं रुपवाटा हरि माझा ॥२॥*
*बापरखुमादेविवरु हृदयस्थ घटीं ।*
*बिंबोनि उफराटी कळा दिसे ॥३॥*

*अर्थ:-*

*प्रपंचाचे ज्ञान हे अज्ञानच असुन परमार्थ ज्ञानाने त्याला वाटेला लावले. त्यामुळे मनातील मी तु पण नष्ट होऊन हृदयात तो निजतेजाने स्थापित होतो. साकार निराकार शुन्याचे शून्य हे सर्व रुप घेऊन तो प्रगट झालेला माझा हरि आहे. असा जो रखुमाईचा पती हृदय घटात अवतरला तरी मूर्खांना तो वेगळा भासतो. असे माऊली बोलतात*

*अभंग २२*

*ज्ञानविज्ञान हरि । नांदे आमुच्या घरीं ।*
*बाह्यजु अभ्यंतरी जाला देव ॥१॥*
*काय सांगूं माय । त्रिभुवन धाय ।*
*पाहातां न समाय । नाना रुपीं ॥ध्रु०॥*
*चढत्या वाढत्या गोष्टी। प्रगट दिसे घटीं ।*
*नामरुपें वैकुंठीं । नेऊनि घाली रया ॥२॥*
*ज्ञानदेवा गोडी । हरिपदीं आवडी ।*
*प्रवृत्तीची थडी । उलंडिली ॥३॥*

*अर्थ:-*

*परमार्थ ज्ञान व संसाराचे विज्ञान होऊन आमच्या घरी नांदत आहे. असा तो देव बाहेर व भितरी एकच झाला. काय सांगु त्याची मात त्याला त्रिभुवन ध्याते व नाना रुपात ही तो समावत नाही भरुन उरतो. अत्यंत सुक्ष्म व अत्यंत प्रचंड वस्तुत तो भरलेला दिसतो असा अनेक रुपात व्यापलेला तो आपल्या भक्तांना वैकुंठात घेऊन जातो. माऊली ज्ञानेश्वर बोलतात त्याच्या वरील प्रेमामुळे मी संसारातील प्रवृतीची नदी ओलांडुन मी हरिप्रेमा काठावर पार झालो.*



# आरोग्य संजीवनी
# हसल्यामुळे होणारे फायदे

ज्योतिर्मय साहित्य

हसणं म्हणजे फक्त चेहऱ्यावर हास्य नाही ते म्हणजे मन, मेंदू आणि शरीरासाठी एक नैसर्गिक औषध आहे. हसण्याचे फायदे, वैज्ञानिक आधारासह आणि रोजच्या जीवनात त्याचा सकारात्मक परिणाम कसा होतो, याची सविस्तर माहिती आहे.

हसण्याचे शारीरिक व मानसिक फायदे

१ तणावमुक्ती ( ) हसताना मेंदूमध्ये एंडॉर्फिन्स आणि डोपामिन नावाचे आनंददायक हार्मोन्स स्रवतात, जे तणाव कमी करतात.

२ रक्तदाब नियंत्रणात ठेवतो नियमित हसण्यामुळे ब्लड प्रेशर कमी होतो व हृदय निरोगी राहते.

३ इम्युनिटी वाढतेहसल्याने शरीरातले – सक्रिय होतात, जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात.

४ श्वसनसंस्थेचा व्यायाम होतो मोठ्याने आणि मनापासून हसल्यास फुफ्फ ुसांचा व्यायाम होतो, त्यामुळे श्वास घेण्याची क्षमता वाढते.

५ वेदनाशामक प्रभाव ( ) हसण्यामुळे नैसर्गिक पेन-किलर्स मेंदूमध्ये तयार होतात. त्यामुळे वेदना कमी जाणवतात.

६ पचन सुधारते हसल्याने पोटाचे स्नायू हालतात, ज्यामुळे पचनसंस्थेवर सकारात्मक परिणाम होतो.

७ सकारात्मक विचारसरणी निर्माण होते मनात आशावाद आणि आनंददायी विचार वाढतात. नैराश्य दूर ठेवण्यास मदत होते.

८ चेहरा तेजस्वी व तरुण राहतो हसल्याने चेहऱ्याचे स्नायू हलतात, त्वचेची झीज कमी होते आणि त्वचेला नैसर्गिक तेज येते.

९ झोप सुधारते हसल्यामुळे मन शांत होते आणि गुडी नाइट स्लीप मिळते.

नातेसंबंध दृढ होतात हसणं म्हणजे सकारात्मक ऊर्जा. हसतमुख व्यक्तींशी लोक जास्त जोडले जातात.

हसण्याचे काही अनोखे ( ) फायदे :

संवाद कौशल्य सुधारते: विनोद व हास्य संवाद अधिक सहज करतात.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

सर्जनशीलता वाढते : हसणारे मन अधिक खुलं आणि क्रिएटिव्ह असतं.

ध्यानात मदत होते : हास्य ध्यान (लौफटर योगा) हा एक वेगळाच अनुभव आहे शरीर आणि मन दोन्ही रिलॅक्स होतात.

वैज्ञानिक आधार

हसताना मेंदूतील लिंबीक सिस्टिम सक्रिय होते जे भावना नियंत्रित करतो.

कोर्टिसल (तणाव निर्माण करणारा हार्मोन) कमी होतो.

दैनंदिन जीवनात हास्याचा समावेश कसा करावा?

१. सकाळी हसून दिवसाची सुरुवात करा (लाफिंग एक्सरसाइज).

२. विनोदी चित्रपट, सिरियल्स बघा.

३. मित्र-परिवारासोबत गप्पा मारा आणि जुने विनोदी किस्से आठवा.

४. हास्य योग ( ) करून पहा.

५. दिवसभरातील एक विनोदी क्षण मनात आठवा आणि मनापासून हसा.

एक प्रेरणादायी विचार:

‘‘हसणं हे फक्त आनंद देत नाही, ते आरोग्यही सुधारतं.‘‘

हास्य हळूहळू आपल्या शरीराचं टॉनिक ठरू शकतं.

हसणं ही कोणतीही गुंतवणूक न करता मिळणारी सर्वात मोठी कमाई आहे!

या धावपळीच्या युगा मध्ये आपलं हसन विसरत चालले.. आहेत तरी आज पासून हसत रहा आनंदी रहा टेन्शन फ्री रहा



# लघु बोधकथा

***अविचार***

***एका शिकाऱ्याने रानात एक कोल्हा पाहिला. तो इतका सुंदर दिसत होता की, त्याचे कातडे आपल्याजवळ असावे अशी त्या शिकाऱ्याला इच्छा झाली. त्याने त्या कोल्ह्याचे बीळ शोधून काढले व त्या बिळाच्या तोंडापुढे एक खड्डा खणला. नंतर त्या खड्ड्यात काही वाळलेली झुडपे घातली व त्यावर मोठा मांसाचा तुकडा ठेवला. कोल्हा तो मांसाचा तुकडा पाहून तेथे येईल व खड्ड्यात पडेल असे त्याला वाटले. सर्व तयारीनंतर तो शिकारी एका झाडापाठीमागे लपून बसला. थोडया वेळाने कोल्हा बाहेर आला व समोरच असलेला मांसाचा तुकडा पाहून तो खावा असे त्याला वाटले; पण त्यात काहीतरी कट असावा असे वाटून तो पुन्हा आपल्या बिळात जाऊन बसला. इतक्यात एक वाघ तेथे आला. काही विचार न करता त्याने त्या मांसाच्या तुकड्यावर झडप घातली व तो खड्ड्यात पडला. त्याच्या पडण्याचा आवाज त्या शिकाऱ्याने ऐकला व तो धावत तेथे गेला. खड्ड्यात कोल्हा पडला असे समजून त्याने खड्ड्यात उडी मारली, तेव्हा वाघाने त्याला फाडून खाल्ले.***

***तात्पर्य***

***- अविचाराने नेहमी अनर्थ घडत असतात.***

# नातं (भाग ७)

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आणि अर्चना पुढे लता काकूला म्हणाली, काही कसे बोलता हो काकू तुम्ही?

मला आता वेळ नाही, मी तुम्हाला निवांत सगळं सांगते, तुम्ही नंतर या.

लता काकू निघून गेल्यानंतर अर्चनाने आनंदसाठी जेवणाचा डबा घेतला व ऑटो बुक करून ती हॉस्पिटलकडे रवाना झाली.

दुपारचे १२ वाजत आले होते. तोवर तिकडे राजुने आनंद यांना उपमा खाऊ घातला, सर्व गोळ्या दिल्या. व आनंद यांना झोप लागली होती.

अर्चना दवाखान्यात पोहचली. आनंद यांच्या रूममध्ये राजू होताच. तो म्हणाला

ताई, तुम्ही थांबा येथे. मला दुसऱ्या रुग्णांनाही बघावे लागते. अर्चना तेथेच थोड्यावेळ मोबाईल मध्ये बातम्या बघत बसली.

दुपारचा एक वाजत आला होता. आनंद यांना जाग आली. त्यांनी डोळे उघडले तर समोर अर्चना बसलेली होती. अर्चनाने आनंद यांना स्मित दिले व म्हणाली, आता बरे वाटते आहे ना, आनंद सर?

तेव्हा आनंद म्हणाले, हो अर्चना पण मला सर म्हणू नका, नुसते आनंद म्हटले तर मला जास्त आवडेल. एकेरी नावात आपलेपणा



वाटतो.

अर्चना हसताच म्हणाली, अगदी खरं आहे आनंद सर तेंव्हा आनंद म्हणाले, पुन्हा सर?

तेंव्हा अर्चना नकळत हसली आणि पुढे म्हणाली, तुम्हाला आता जेवण करावयाचे आहे, मी मेथीची छान भाजी, पोळी व वरण भात आणला आहे.

आनंद म्हणाला, ठीक आहे जेवण करतो मी आता. या दुखण्यामुळे तुमच्या हातचे जेवण मिळाले हे मात्र खरं.

आनंदने जेवण केले. त्यांना भाजी खूप आवडली होती. ते म्हणाले, अर्चना तुमच्या हातात जादू आहे, ही भाजी खाऊन मला माझ्या आजीच्या हातची मेथीची भाजी आठवली,



गिरीश खं. वसेकर, पुणे
94226 59400

अगदी अशीच भाजी माझी आजी करायची.

तेंव्हा अर्चना म्हणाली, अरे वा म्हणजे मला जमतं सारं?

तेंव्हा आनंद मनातल्या मनात म्हणाला, पसंद आहे व एक

क्षण थांबला, तेव्हा अर्चना म्हणाली, काय झाले? काय

पुटपुटलात मनातल्या मनात? तेंव्हा आनंद म्हणाले,

अतिशय सुंदर जेवण आहे हे. तेंव्हा अर्चना म्हणाली, बस झालं. किती स्तुती करता आहात? खरं तर मी अगदी साधं जेवण आणले आहे.

आनंदचे जेवण झाले. अर्चना म्हणाली, आता लगेचच आडवे होण्यास डॉ.ची परवानगी नाही पण थोड्या वेळ मोबाईल बघण्याची परवानगी आहे बरं का?

आनंदने मोबाईलचे लॉक उघडले व व्हॉट्सअप बघत होते, इतक्यात एक बातमी समोर आली,

ती म्हणजे पन्नाशी नंतर विधवा स्त्रियांसाठी किंवा पत्नी नसलेल्या पुरुषासाठी एक आगळं वेगळं संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

त्याचा मथळा होता, उत्तर आयुष्यासाठी शोध सोबतीचा.

तेथे हिंदू धर्मातील असे स्त्री पुरुष तेथे एकत्र येऊन एकमेकांना भेटू शकतात, आपल्या पुढील आयुष्यासाठी सम विचारी सोबती शोधू शकतात.

ती बातमी वाचून आनंद एक क्षण थांबले आणि अर्चनाला म्हणाले, हे वाचा ना, बघा काय आहे ते? अर्चनाने ते वाचले, आणि आनंदकडे पाहतच राहिली, काही क्षण....




# फातिमाबी साहित्य संमेलनात प्रवीण बागडे यांचा काव्यवाचनासाठी सन्मान



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

श्रीरामपूर । प्रतिनिधी : भारताच्या पहिल्या मराठी मुस्लिम महिला शिक्षिका फातिमा शेख यांच्या जयंतीनिमित्त ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था, श्रीरामपूर यांच्या वतीने ११ जानेवारी २०२६ रोजी ऑकेशन्स बँक्वेट हॉल, बेलापूर रोड येथे आयोजित चौथे राज्यस्तरीय ''युगस्त्री फातिमाबी शेख'' साहित्य संमेलन उत्साहात पार पडले. या संमेलनातील कवी संमेलन सत्रात सामाजिक आशय असलेल्या प्रभावी काव्यवाचनासाठी नागपूर येथील साहित्यिक प्रवीण बागडे तसेच प्रभाकर सोमकुवर यांचा गौरव करण्यात आला. 'युगस्त्री फातिमा माई' या विषयावर तसेच सामाजिक वास्तव मांडणाऱ्या कवितांच्या सादरीकरणासाठी दोन्ही कवींना मराठी भाषांतरित पवित्र कुरआन, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या सन्मानाबद्दल साहित्यिक वर्तुळातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

फातिमा शेख यांच्या कार्याचा गौरव करताना फातिमाबी शेख प्रतिनिधिक काव्यसंग्रहाच्या संपादिका अनिसा सिकंदर यांनी, फातिमाबींची जयंती शाळा-महाविद्यालये तसेच शासकीय-निमशासकीय कार्यालयांमध्ये व्यापक पातळीवर साजरी व्हावी, तसेच त्यांच्या नावाने विद्यापीठ स्थापन करण्यासाठी ठोस प्रयत्न होणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन केले. कविसंमेलन नूरजहां शेख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतून आलेल्या कवींनाही सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन खाजाभाई यांनी केले, तर आभारप्रदर्शन शफी सैय्यद यांनी केले. स्त्रीशिक्षण, सामाजिक समता आणि प्रबोधनाचा वारसा जपणाऱ्या फातिमाबी शेख यांच्या स्मृतीला उजाळा देणारे हे संमेलन साहित्यप्रेमींमध्ये विशेष चर्चेचा विषय ठरले.

# ''यशस्वी होताना माझा प्रवास'' नव उद्योजकांसाठी प्रेरणादायी - माधव मनोहर जोशी

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

अहिल्यानगर : १३ जानेवारी २०२६ रोजी अहिल्यानगर येथील रेडिओ नगर ९०.४ ह्या रेडिओ केंद्राचा १५ वा वर्धापन दिन नगर येथील संजोग हॉटेलच्या भव्य हॉलमध्ये साजरा झाला. ह्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुंबईचे ज्येष्ठ साहित्यिक श्री. माधव मनोहर जोशी ह्यांनी भूषविले.

हे रेडिओ केंद्र म्हणजे नगरच्याच स्नेहालय ह्या संस्थेचा कम्युनिटी रेडिओ असून त्याचे संपूर्ण नगर जिल्ह्यात तसेच देश विदेशात असंख्य श्रोते आहेत. स्नेहालय या संस्थेची स्थापना १९८९ साली करण्यात आली. त्याचे संस्थापक आहेत डॉक्टर गिरीश कुलकर्णी. आज या संस्थेचे जगभरात नाव आहे. हिंसाचार, शोषण आणि तस्करीला बळी पडलेल्या महिला आणि त्यांच्या अनाथ मुलांसाठी सुरक्षित निवारा पुरवणे, तसेच एड्सग्रस्त लोकांसाठी वैद्यकीय आणि मानसिक आधार देणे, अशा मुलांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबवणे, महिला सक्षमीकरण, आणि दिव्यांगाना कौशल्य विकासाचे शिक्षण घेऊन त्यांना सक्षम करणे अशी खूप महान उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून स्नेहालय संस्थेची स्थापना झालेली आहे.

गेली पंधरा वर्षे रेडिओ नगर ९०.४ या कम्युनिटी रेडिओच्या माध्यमातून ह्या रेडिओ केंद्राने अनेक समाज प्रबोधनात्मक तसेच करमणूक प्रधान कार्यक्रमांचे प्रसारण केलेले आहे.

ज्येष्ठ पत्रकार श्री भूषण देशमुख यांनी प्रास्ताविक भाषण करताना स्नेहालयाचा तसेच रेडिओ नगरच्या आतापर्यंतच्या कामगिरीचा आढावा घेतला आणि भविष्यातील योजनांची माहिती सुद्धा दिली. ह्या कार्यक्रमासाठी इंग्लंडहून प्रसिद्ध मीडिया आणि डॉक्युमेंटरी एक्सपर्ट श्री जॉन कोस्टर, तसेच इंग्लंडमधील प्रसिद्ध कलाकार लॉरेन होसजेन, नगर एमआयडीसी मधील रिजनल ऑफिसर डॉ. गणेश राठोड, दैनिक सकाळच्या नगर आवृत्तीचे संपादक श्री प्रकाश पाटील, नगरचे प्रसिद्ध उद्योजक आणि रेडिओ केंद्राचे ज्येष्ठ सल्लागार श्री संजय पारनाईक आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री माधव मनोहर जोशी इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी ''फिटे अंधाराचे जाळे'' ह्या पुस्तकाचे ऑडिओ रूपांतर प्रकाशित करण्यात आले. त्याचबरोबर अहिल्यानगरमधील एकूण २५ यशस्वी उद्योजकांच्या मुलाखतींवर आधारित ''यशस्वी होताना माझा प्रवास'' ह्या नावाच्या पुस्तकाचे सुद्धा प्रकाशन करण्यात आले. ह्या रेडिओ केंद्रावरून गेल्यावर्षी या एकूण २५ यशस्वी उद्योजकांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या होत्या. त्या सर्व मुलाखती श्री संजय पारनाईक यांनी घेतल्या होत्या. त्या मुलाखतींचे शब्दांकन ह्या पुस्तकासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री माधव मनोहर जोशी यांनी केलेले आहे.

याप्रसंगी श्री जॉन कोस्टर तसेच लॉरेन होसजेन, श्री संजय पारनाईक आणि श्री माधव मनोहर जोशी ह्यांना मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना श्री संजय पारनाईक यांनी २५ उद्योजकांच्या मुलाखती घेण्याची संकल्पना आपल्याला कशी सुचली हे विस्तृतपणे विशद केले. मराठी माणूस हा साधारणपणे उद्योग व्यवसायामध्ये मागे पडतो आणि ही जी मराठी मनामध्ये असलेली सल आहे ती काढून टाकण्याच्या उद्देशाने श्री संजय पारनाईक यांनी अशा खुबीने मुलाखती घेतल्या की जेणेकरून त्या ऐकून ही सल दूर व्हावी आणि तरुण वर्गाला उद्योगधंद्याकडे वळण्यासाठी प्रोत्साहित करावे. त्यांचा हा उद्देश बहुतांशी सफल होईल याची त्यांना खात्री आहे.

आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री जोशी म्हणाले की यशस्वी होताना माझा प्रवास हे जे पुस्तक प्रकाशित झालेलं आहे त्यामध्ये सर्व उद्योजकांनी मनमोकळेपणे व्यवसाय सुरू करताना त्यांना आलेल्या अडचणी आणि त्यावर त्यांनी मात करत यशोशिखर कसे गाठले हे सांगितले आहे, आणि ही सर्व माहिती आगामी पिढ्यांसाठी विशेष करून ज्यांना नवीन स्टार्टअप किंवा उद्योग व्यवसाय सुरू करायचा आहे अशा लोकांसाठी हे पुस्तक नक्कीच मार्गदर्शक ठरून त्यांना नवीन उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहित करेल. आयुष्य तसेच उद्योग व्यवसायात यशस्वी आणि आनंदी होण्यासाठीचा एक मंत्र सांगताना श्री जोशी यांनी प्रत्येकाने आपल्या आयुष्याचा अनालिसिस करून त्याप्रमाणे आचरण करण्याचा सल्ला दिला.

आभार प्रदर्शनाचे भाषण करताना संस्थेचे पालक सल्लागार श्री राजीव गुजर यांनी संस्थेचे अभिष्टचिंतन करत सर्वांना शुभेच्छा दिल्या.

हे पुस्तक ज्यांना विकत घ्यायचे असेल त्यांनी कृपया स्नेहालय किंवा रेडिओ नगर च्या श्री अंसुल ह्यांना त्यांच्या + ९१ ९८६०८ ४०९०४ ह्या मोबाईल नंबर वर संपर्क करावा. पुस्तकाची किंमत ₹ २५० अधिक कुरिअर चार्जेस आहे.






# अहोबिलम

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

२) प्रल्हाद वरद मंदिर इथे भक्त प्रल्हाद आला वरदान मिळाले. याच्या नजीकच, प्रल्हाद तीर्थ नावाचे तीर्थस्थान आहे. हे भक्त प्रल्हादाच्या तपश्चर्येचे स्थान होते.

३) भार्गव नरसिंह मंदिर

हे भार्गव तीर्थ जवळ असलेले एक सुंदर मंदिर आहे. भगवान परशुराम यांनी येथे तप करून पापनाश केला.

४) पवना नरसिंह मंदिर* हे पवित्र अशा पवना नदीच्या काठी वसलेले मंदिर आहे. मन शुद्धी व रोग नाश यासाठी या पवित्र नदीत स्नान करून नरसिंव्हाचे दर्शन घेण्याची पद्धत आहे.

वरची मंदिरे

५) अहोबलेश्वर मंदिर

हे नरसिंहाचे उग्ररूप दर्शविणारे मुख्य मंदिर आहे. हे सर्वात प्राचीन मंदिर आहे. या उग्र रूपाच्या दर्शनाने पाप नाश होतो असा विश्वास आहे.

६) ज्वाला नरसिंह मंदिर

हे अत्यंत दुर्गम स्थानी वसलेले मंदिर आहे. हिरण्यकशपावर क्रोध व्यक्त करताना चा भाव विग्रहात प्रतिबिंबित झाला आहे. हे खालच्या अहोबिलम पासून दहा ते अकरा किलोमीटर दूर असून त्याची उंची ९०० ते साडेनऊशे मीटर आहे. आणि डोंगरदऱ्यात अत्यंत दुर्गम ठिकाणी ही स्थापित आहे.

७) छत्र वटा नरसिंह मंदिर* यातील छत्र याचा अर्थ सावली किंवा संरक्षण, तर वट म्हणजे वडाचे झाड ज्यावेळेस नरसिंव्हांनी क्रोधाने हिरण्यकश्यपूचा वध केला. त्यानंतर काही काळ भगवंत, वडाच्या झाडाखाली विसावले. इथे त्यांचे रूप सौम्य झाले. हे खालील अहोबिलम पासून आठ ते नऊ किलोमीटर अंतरावर आहे. आणि याची उंची ८४० ते ८८० मीटर इतकी आहे.

८) करंज नरसिंह मंदिर

हे मंदिर करंज वृक्षाच्या लगत उभे आहे. ज्यावेळेस नरसिंव्हांनी हिरण्यकशपुचा वध केला, त्यावेळेस ते अत्यंत उग्र रूपात होते. भक्त प्रल्हादाच्या विनंतीवरून, त्यांनी आपले उग्ररूप हळूहळू कमी केले. त्यासाठी ते नल्लामल्लाच्या जंगलात संचार करू लागले. इथे करंज वृक्षाच्या तळा जवळ विसावून त्यांनी ऋषी,मुनींना,भक्तांना अभय दिले. त्यांच्या पापांचा नाश केला. यामुळे हे मंदिर इथे स्थापित झाले आहे.

९) मालोला नरसिंह मंदिर

हे माता लक्ष्मी सह असलेले सौम्य रूपातील नरसिंहाचे मंदिर आहे खालील अहोबिलंम पासून सात ते आठ किलोमीटर अंतरावर हे मंदिर स्थित आहे याची उंची ८०० ते ८२० मीटर इतकी येते. माता लक्ष्मीच्या सानिध्यात प्रभूचे उग्ररूप मावळून शांत सौम्य भावात ते मातेसह इथे आनंदात विराजमान झाले. या रूपाचे दर्शन घेतल्याने कौटुंबिक शांती, गृहसौख्य ,मानसिक स्थैर्य, भक्तांना लाभते म्हणून या मंदिराचे वैशिष्ट्य लोक सांगतात.

१०) वराह नरसिंह मंदिर

भगवंताच्या वराह रूपातील अत्यंत उग्र व संहारक शक्तीचा भाव असणारे नरसिंहाचे हे क्रोधायमान असणारे रूप आहे. हे मंदिर खालील अहोबिलंम पासून नऊ किलोमीटर अंतरावर आहे. इथे पूर्ण गिर्यारोहण करूनच जावे लागते. जंगलातला क्लिस्ट मार्ग आहे. या मंदिरातील दर्शनाने शत्रु बाधा, अभिचार, भयरोग नाश होतो. अशी भक्तांची श्रद्धा आहे. मंदिरातील मूर्तीचा भाव हा अत्यंत उग्र असा आहे. तो भक्तांचे रक्षण करणारा व संहारक शक्तीने युक्त असा आहे.

भगवान नरसिंहाच्या चरणावर विनम्रतेने अभिवादन करून हा भाग इथेच थांबवण्यात थांबवूयात.

उग्रं वीरं महाविष्णुं ज्वलन्तं सर्वतोमुखम् ।
नृसिंहं भीषणं भद्रं मृत्युमृत्युं नमाम्यहम् ।।






## विक्रम वेताळ आणि डायरेक्ट मार्केटिंग



विक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो दलाल स्ट्रीटवर गेला, झाडावर लटकलेले प्रेत खांद्यावर घेतले व तो सोनापूरा कडे चालू लागला. येवढ्यात प्रेतात बसलेला वेताळ जागा झाला आणि म्हणाला, विक्रमा तुझ्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे मला खरोखरच कौतुक वाटते असेच सातत्य आणि निष्ठा जर गुंतवणूकदार बाजारावर दाखवणार असतिल तर त्यांना खूप चांगला परतावा मिळवून ते धर्मान होण्यापासून त्यांना कोणीच रोखू शकत नाही, पण वर्तमानपत्र आणि टीव्हीवरील सतत येणाऱ्या बातम्यांमुळे गुंतवणूकदारांचे मनोधैर्य खचत नसेल का?

"ब्लडबाथ ऑन दलाल स्ट्रीट " किंवा "गुंतवणूकदारांचे दोन लाख कोटी बुडाले"


वगैरे शीर्षके तू बघितलीस तर तुझेही मनोधैर्य खचेल असे तुला वाटत नाही का ? "


या माझ्या सर्व प्रश्नांची तू समर्पक उत्तरे दिली नाहीस तर तुझ्या पोर्टफोलिओची शंभर शकले होऊन ती तुझ्याच पायावर लागतील "

असे म्हणून वेताळ उत्तराची वाट पाहू लागला.

विक्रमाने थोडा विचार करून बोलायला सुरुवात केली, विक्रम म्हणाला, "वेताळा, मुळातच शेअर बाजाराची किंवा म्युचुअल फंडाची गुंतवणूक ही दीर्घकालीन (लॉंग टाइम) गुंतवणूक असते. अर्थात प्रत्येकाची लॉंग टर्म वेगळी वेगळी असू शकते. आणि इथेच खरी गल्लत होते.

क्रमश: .......




# पद्मविभूषण इलयाराजा यांना पद्मपाणि पुरस्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या अकराव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची घोषणा करण्यात आलेली असून बुधवार, दि. २८ जानेवारी ते रविवार, दि. ०१ फेब्रुवारी २०२६ या दरम्यान हा महोत्सव छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलावंताच्या मांदियाळीत संपन्न होणार आहे. या महोत्सवात भारतीय सिनेसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल दिला जाणारा पद्मपाणि पुरस्कार चित्रपट संगीताला नवी दिशा देणारे ज्येष्ठ भारतीय संगीतकार, पद्मविभूषण श्री. इलयाराजा (राज्यसभा सदस्य) यांना जाहीर करण्यात आला आहे. याबाबतची घोषणा महोत्सवाचे संस्थापक व संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम व महोत्सवाचे मानद अध्यक्ष आशुतोष गोवारीकर यांनी केली आहे.

पद्मपाणि पुरस्कार निवड समितीने श्री. इलयाराजा यांची निवड केली असून या समितीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ समीक्षक लतिका पाडगांवकर तर सदस्यपदी चित्रपट दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर, सुनील सुकथनकर व चंद्रकांत कुलकर्णी यांचा समावेश



होता. पुरस्काराचे स्वरूप पद्मपाणि सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व दोन लक्ष रूपये असे आहे.

पद्मपाणि पुरस्कार प्रदान सोहळा मान्यवरांच्या हस्ते महोत्सव उद्घाटन कार्यक्रमात बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजता रुक्मिणी सभागृह, एमजीएम परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. तर महोत्सव पुढील पाच दिवस आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे संपन्न होणार आहे.

गेल्या पाच दशकांहून अधिक काळ इलयाराजा यांनी भारतीय चित्रपटसंगीतात सातत्यपूर्ण आणि सर्जनशील योगदान दिले आहे. आतापर्यंत त्यांनी ७,००० हून अधिक गाणी तसेच १,५०० पेक्षा अधिक चित्रपटांसाठी संगीत निर्मिती केली आहे. तामिळ, तेलुगू, मल्याळम, कन्नड, हिंदी, मराठी आदी विविध भारतीय भाषांमधील त्यांच्या संगीतरचनांनी रसिकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे. कर्नाटकी संगीत, हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत व लोकसंगीताच्या बाजावर आधारलेले, तसेच पाश्चात्त्य सिम्फनीची शिस्त लाभलेले संगीत ही त्यांची प्रमुख ओळख आहे. चित्रपटातील प्रसंगांना भावनिक खोली देणारे पार्श्वसंगीत आणि कथानकाला पूरक ठरणारी संगीतरचना हि इलयाराजा यांची प्रमुख ओळख आहे. कला, करुणा आणि सर्जनशील साधनेचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या पद्मपाणि पुरस्कारासाठी इलयाराजा यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या संगीतातील आध्यात्मिकता, शिस्त आणि मानवी संवेदनशीलतेमुळे ते जनमानसात 'इसैग्नानी' (संगीतक्षेत्रातील ऋषीतुल्य व्यक्तिमत्व) म्हणून ओळखले जातात.

नाथ ग्रुप, एमजीएम विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण सेंटर प्रस्तुत व मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा केंद्रीय सूचना व प्रसारण मंत्रालय भारत सरकार, सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने संपन्न होत असून प्रोझोन मॉल यांचे विशेष सहकार्य या फेस्टिव्हलला मिळालेले आहे. एनएफडीसी व महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन यांची सहप्रस्तुती असणार आहे. सॉलीटेअर टॉवर्स, कालिका स्टील, डेली हंट हे या महोत्सवाचे सह आयोजक आहेत.

मराठवाड्याचे नाव चित्रपट क्षेत्रात जागतिक व्यासपीठावर नेणाऱ्या या महोत्सवात देशभरातील नागरीकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम, मानद अध्यक्ष आशुतोष गोवारीकर, सतीश कागलीवाल, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, महोत्सवाचे संचालक सुनील सुकथनकर, कार्यकारी संचालक चंद्रकांत कुलकर्णी, महोत्सवाचे संयोजक नीलेश राऊत, सहसंचालक जयप्रद देसाई व ज्ञानेश झोटींग, डॉ. अपर्णा कक्कड, श्वेता कागलीवाल, डॉ.आशिष गाडेकर, कला संचालक डॉ.शिव कदम, डॉ.रेखा शेळके, डॉ. प्रेरणा दळवी, शिव फाळके, प्रा. दासू वैद्य, डॉ. आनंद निकाळजे, सुबोध जाधव, अमित पाटील, निखील भालेराव आदींनी केले आहे.

# निवास खांदेवाले यांना धरणीधर गांधी पुरस्कार

**ज्योतिर्मय साहित्य**



नागपूर : डॉ. गिरीश गांधी फाउंडेशनतर्फे देण्यात येणारा धरणीधर गांधी समाज शिक्षक पुरस्कार यंदा ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांना घोषित झाला आहे. पुरस्कार प्रदान सोहळा धरणीधर गांधी यांच्या स्मृतिदिनी ५ फ ेब्रुवारी रोजी होणार आहे. पुरस्काराचे स्वरूप एक लाख रुपये, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह असे आहे.

धरणीधर गांधी यांचा जन्म नागपूर जिल्ह्यातील एका लहान गावात शेतकरी कुटुंबात झाला. कुटुंबात शेती हाच व्यवसाय असल्यामुळे आणि शिक्षणाची व्यवस्था नसल्यामुळे नागपूर येथे मॉडेल मिलमध्ये त्यांनी नोकरी पत्करली. कुटुंबाचा संस्कार गांधी, विनोबांच्या विचारांचा प्रभाव व शिक्षणाची आवड असल्यामुळे त्यांनी नोकरी करतानाच बी. कॉम. व पुढे एम. कॉमची पदवी प्राप्त केली. ते सी. पी. अँड बेरार महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. हे सर्व करीत असताना त्यांनी सामाजिक बांधिलकी कायम ठेवली. ५ फेब्रुवारी हा त्यांचा स्मृतिदिवस असून त्यानिमित्त जे प्राध्यापक उत्तम पद्धतीने विद्यादान करीत असतानाच समाजप्रबोधनाचे काम करतात, त्यांना हा पुरस्कार देण्यात येतो. यावर्षी हा पुरस्कार डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांना देण्यात येणार आहे.

# १९७६ स्थापत्य अभियांत्रिकी बॅचचा सुवर्णमहोत्सवी सोहळा दिमाखात साजरा

## आठवणींना उजाळा, गुरुगौरव, कुटुंबीयांचा सन्मान आणि मातृसंस्थेसाठी एक लाखांचे योगदान

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर (सीमा गाडेकर) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे १९७६ सिव्हिल इंजिनिअरिंग बॅचचा सुवर्णमहोत्सव अत्यंत भावूक, उत्साही आणि आनंददायी वातावरणात मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. तब्बल ५० वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणी, संघर्ष, मैत्री आणि यशाचा प्रवास पुन्हा एकदा अनुभवला.

कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत भावपूर्ण शब्दांत ''स्वागतम सुस्वागतम'' या मंगल घोषणेसह झाली. १९७६ पासून सुरू झालेल्या आठवणींच्या, स्वप्नांच्या आणि अथांग मैत्रीच्या प्रवासाला उजाळा देताना संपूर्ण सभागृह भावविवश झाले होते.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय ही केवळ एक वास्तू नसून, आयुष्याला आकार देणारे मंदिर आहे, या भावनेने सर्व माजी विद्यार्थी भारावून गेले.

या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमाचे प्रभावी, भावस्पर्शी आणि ओघवते सूत्रसंचालन श्रीमती सीमा गाडेकर (२००५ इलेक्ट्रिकल बॅच) आणि श्री प्रणव मोरे यांनी केले. सूत्रसंचालनादरम्यान जुन्या कॉलेज कट्ट्यावरील आठवणी, अभ्यासाचे दिवस, वस्तीगृहातील जीवन, मैत्रीचे बंध आणि कुटुंबाचा पाठिंबा यांचा सुंदर भावनिक पट उलगडण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर या सुवर्णमहोत्सवासाठी पुढाकार घेणारे आदरणीय श्री एस. एम. जाधव सर व आदरणीय श्री डी. आर. कंदी सर यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. श्री कंदी यांनी आपला मागचा प्रवास व सिंचन विभागातील योगदान व कार्य यावर प्रकाश टाकला. श्री एस.एम. जाधव यांनी ही पुर्व इतिहास व त्यावेळचे शिक्षण व सुविधा विषयी सांगीतले.

कार्यक्रमातील एक अत्यंत भावनिक आणि गौरवपूर्ण टप्पा म्हणजे 'गुरुगौरव'. ५० वर्षांपूर्वी ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करणारे, शिस्त आणि मूल्यांची शिकवण देणारे गुरुजन व सत्कार मुर्ति सेवानिवृत्त प्राचार्य श्री बोकनकर सर, बी.डी. कुलकर्णी सर व जे.जी. मुळे सर, श्री कंदी साहेब, एस एम. जाधव साहेब यांचा यथोचित सत्कार संघटनेचे अध्यक्ष श्री किरण एंबल व संघटनेचे सदस्य श्री उत्तम कालवणे, श्री प्रशांत नानकर, श्री आर.एम. दमगीर, श्री शक्करवार, श्री सरडे, श्री एरनाळे, श्री गडेकर, शुभांगी सपकाळ यांच्या हस्ते करण्यात आला. त्यांच्या उपस्थितीने संपूर्ण सभागृह भारावून गेले. या गुरुजनांचा यथोचित सत्कार करून शिष्यांनी आपल्या कृतज्ञतेची भावना व्यक्त केली.

या सुवर्णमहोत्सवात कुटुंबीयांचा विशेष सन्मान करण्यात आला. अभियंत्यांच्या यशामागे त्यांच्या सहचारिणी, सहचर आणि कुटुंबीयांचा मोठा वाटा असल्याचे अधोरेखित करत उपस्थित सर्व कुटुंबीयांचा पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. यामुळे कार्यक्रम




अधिकच भावनिक झाला. प्रा.बोकणकर, प्रा.बी डी कुलकर्णी, प्रा. मुळे यांनी ही महाविद्यालयात आल्यानंतर माहेरी आल्यागत वाटते व तिघानीही आपण केलेले शैक्षणिक कार्य विषद केले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे प्राचार्य श्री डंभारे, सौ कोरान्ने यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले आणि ह्या कार्यक्रमासाठी प्राध्यापक वृंद, कर्मचारी व विद्यार्थी हेही ऊपस्थित होते. या प्रसंगी कंदी साहेब व त्यांच्या माजी सहकारी मित्रानी मिळून या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मातृसंस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त करत ₹१,००,००० (एक लाख रुपये) इतकी देणगी असोसिएशनला दिली. तसेच श्री नरोडे सर यांनी ₹८,००० रुपयांची वैयक्तिक मदत दिली. याशिवाय बॅचमधील ३ सदस्यांनी आजीव सदस्यत्व स्वीकारून संस्थेशी आपले नाते कायमचे जोडले.

आपल्या जुन्या संस्थेला आणि येणाऱ्या पिढीला मदत करण्याची ही भावना सर्वांनी विशेष कौतुकास्पद असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमादरम्यान प्रत्येक अभियंते भाऊ आपल्या भावना मोकळेपणाने व्यक्त करत होता. कॉलेज कट्ट्यावरील आयुष्य, वर्गातील किस्से, परीक्षा, चित्रपट पाहण्यासाठी केलेले खटाटोप, तसेच बॉईज हॉस्टेल 'ए' मधील वस्तीगृहातील जीवन यावर भरभरून चर्चा झाली. सर्व माजी विद्यार्थी पुन्हा एकदा हॉस्टेलमध्ये गेले, तेथील मेसमध्ये जेवणाचा आस्वाद घेतला आणि ५० वर्षांपूर्वी जगलेले महाविद्यालयीन जीवन पुन्हा नव्याने अनुभवले.

महाविद्यालयीन जीवनातील किस्से सांगताना हास्याचा प्रचंड कल्लोळ उडाला होता.... कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाच्या प्रांगणात सर्व माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत ग्रुप फोटो काढून त्या सुवर्णक्षणांना कायमचे आपल्या मनात बंदीस्त करून ठेवले. तसेच स्थापत्य अभियांत्रिकीचे माजी विभागप्रमुख प्रा.डॉ.आर.एम. दमगीर लिखीत - क्षितीजावरचे तारे, एक अभियंता दोन शब्द, कर्तबगार माजी विद्यार्थावरील हे पुस्तक सर्वांना भेट देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्री किरण यंबल यांनी केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इंजि. सिमा गाडेकर यांनी तर आभार प्रदर्शन सचिव श्री प्रशांत नानकर यांनी केले.

हा सुवर्णमहोत्सव यशस्वी करण्यासाठी माजी विद्यार्थी संघटनेचे श्री उत्तम काळवणे, श्री भास्कर चाटे, आर.एम. दमगीर, श्री.सरडे, श्री शशीकांत एरनाळे, श्री दीपक गडेकर, श्री शक्करवार, श्रीमती शुभांगी सपकाळ मॅडम, माजी विद्यार्थी संघटनेचे सर्व सदस्य तसेच स्टुडंट्स अँल्युमनी टीममधील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विशेष परिश्रम घेतले.

हा कार्यक्रम म्हणजे केवळ पुनर्भेट नव्हती, तर मैत्री, कृतज्ञता, गुरुप्रेम आणि मातृसंस्थेशी असलेल्या अतूट नात्याचा जिवंत उत्सव ठरला.

# विसावलेल्या पाऊलखुणात..!

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

विचाराने प्रेरीत झालेल्या शब्दांचे शब्द आणि अंगी संचारणारी शक्ती एकवटून कविता सादर केली. चेहऱ्यावर एक प्रकारचे समाधान आणि मनाला शांती मिळाली. कशी केली, काय केली पेक्षा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कवी कट्ट्यावर सादर केली. याच्या प्रसन्नतेची एक लकेर चेहऱ्यावर उमटली. आणि त्याची जीवनातील सर्वात सुंदर अशी पोहच म्हणजे सुंदर अशी आबासाहेबांची माझ्या महाराजांची सुंदर अशी प्रतिमा असलेले ते सन्मान चिन्ह आणि सुंदर अक्षरात उमटलेली ती नावाची अक्षरे असलेले सन्मान पत्र मन विचारांच्या लाटेवर तरंगत आकाशी पोहचले. थोडा फार फेरफटका मारल्यानंतर उद्या येण्याच्या प्रतिक्षेत पाऊले आल्या वाटेने परतीच्या वाटेवर वळली. त्या वातावरणामुळे असेल मनातल्या मनात ..

माझ्या मराठीची मी
वर्णावी कशी महती,
जन्माताच मुखातून
होते स्वरांची उत्पत्ती.
नव्या उमेदीने कोवळ्या
किरणांची
पखरण
करत
उगवलेला
तो सूर्य,
त्याचे
कार्य



अव्याहतपणे चालूच होते.आपले मार्गक्रमण करत त्याचे अव्याहतपणे सुरू असलेले चक्र वेळेत मार्गस्थ झाले. पुन्हा लगबग गोंधळ दिनक्रम आटोपून पाऊले काल प्रतिक्षेत ठेवलेल्या वाटेवर मार्गस्थ झाली.

प्रवेशद्वारातून आत शिरताच सहज नजर उजवीकडे वळली. आणि ते रंगबिरंगी रंग आकर्षून घेणारी ती रांगोळी तिच्या जवळ गेले. आणि मनोमन त्या कल्पना शक्तीला सलाम, मी मराठी समुद्राची शाई, आकाशाचा कागद,आणि त्यामध्ये मी मराठी आणि पंखात असलेले विविध रंग जसे माझ्या मराठी जसे विविध प्रकार तसे ते विविध प्रकारचे रंग अर्थात मला रांगोळीतून समजलेला अर्थ, माहीत नाही अजून वेगळेपण ही असू शकेल.पण मला तरी त्या रांगोळीतून उमगलेला अर्थ हा होता. आणि मग ते सहज शब्द शब्दातून गुंफलेली ती चारोळी

ज्ञानगंगेच्या प्रवाहात हळूवार
उमलते
कलिका, शब्दरुपी अलंकार
लेवून.
मनमोहक सुमन ते फुलते,
वाड़मयरुपी बीज ते अंकुरुन.

काही क्षणानंतर मंडप क्र.१ मध्ये जाऊन उद्घाटन समारंभ मा. मुख्यमंत्री तसेच अनेक विचारवंतांचे विचार आत्मसात करून कवी संमेलन, बालवाचक कट्टा, संवाद बालकुमारांशी गझल कट्टा अशा विविध कट्ट्याना भेटी दिल्या. सायंकाळी शिकायला गेलो एक चे काही क्षणांचा आनंद तुफान गर्दीत घेतला. तसेच कथाकथन, मुलाखत, पुस्तक चर्चा, परिसंवाद, हास्यजत्रा, लक्षवेधी कादंबरीकार यांच्या चर्चा आणि समारोप अशा वैविध्य आणि नाविन्य पूर्ण कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला. तसे तर खूप काही मिळालं. प्रत्येक विषयावर लेखन करायचे झाले तर खूप विस्तृत लेखन होईल. खूप खूप काही मिळाले.

पुस्तक स्टॉलवर गेल्यानंतर आपण कुठे आहोत याची जाणीव झाली. अफाट अशा या ज्ञान सागराच्या प्रवाहात तळाशी ओसविणारा एक थेंब असतो अशी अवस्था झाली. अन् वाचाल तर वाचाल अशी वाक्ये डोक्यात घुमू लागली. आणि मग विचार आला की थेंबे थेंबे तळे साचे जेवढे काही घेता येईल तेवढा ज्ञान संचय करण्याचा निश्चय करून बाहेर पडले. आणि कवितेचे चार शब्द गुंफले गेले.

आज माझ्या
या ओंजळीत
किती अन्
काय सामावले,
ज्ञान
सागराच्या
शिंपल्यातील
काही
अनमोल मोती मी
वेचले.



सौ.वैशाली चंद्रकांत महाडिक.
श्री क्षेत्र निनाम -सातारा
सं. क्र.-९७६७४३७९२३

विचारांच्या प्रवाहाला वाऱ्याची गती मिळाली. मागे सुटून गेलेल्या या क्षणात काही नविन ओळखी, नविन सकारात्मक दृष्टिकोन, आत्मविश्वास, अनुभव, जे चांगले, ते ते घेण्याचा प्रयत्न केला. नकारात्मक ते मागे सोडले. एवढ्या गर्दीतही प्रवाहात न आलेले पण मराठी भाषेबद्दल नितांत प्रेम करणाऱ्या अशाही काही व्यक्ती भेटल्या. जे विविध प्रकारच्या उपक्रमातून मराठीच्या विकासासाठी धडपडत होते. साहित्यिक क्षेत्रातील अनेक अशी नावे आहेत दिग्गज ज्येष्ठ साहित्यिकांची ज्यांची प्रोस्ताहन रुपी कौतुकाची थाप पाठीवर मिळाली.

आपल्या मराठी बद्दल तर काय लिहिणार, तिच्यात इतके काही सामावले आहे. तिच्यावर लिहणे ही तितकी सोपी गोष्ट नाही. तिच्या यत्किंचित जवळ जाण्याचे भाग्य लाभले हेच माझ्यासाठी भाग्य आहे. पण त्यातच कुठेतरी थोडेसे मन खट्टू झाले आजची आपल्या मराठीची अवस्था जाणवली आणि थोडे कुठेतरी मन नाराज झाले. म्हणजे कोणाला दोष नाही द्यायचा पण असे वाटले की.. ही वाट कुठेतरी दुरात धावते आहे का? असा प्रश्न पडला.आणि कवितेच्या ओळी सुचल्या.

_...आणि ती वाट दुरात धावते
तेव्हा..._

एकट्या एककल्ली वाटेला
चालता चालता,
का कोण जाणे पानांची ती
सळसळ खुणावते काही नकळे
नकळता,
बेहोश बेधुंद दुरात धावणारी ती
पायवाट,
हळव्या किनारीची तिथे एक
डगरवाट.
ऐकू येतो सुर निरागस दूर
पानातून
प्रतिध्वनी तो घुमतो खोल त्या
दरीतून.
उगाच हातून नकळत काहीतरी
निसटून चालले का..?

जन्मतः मिळालेले आणि आपले हक्काचे असे एक वैभव ते म्हणजे माता मायदेश आणि मातृभाषा जे आपल्यापासून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. त्यातील ही माझी मायबोली आमची मराठी आहे आम्हाला तिचा अभिमान.

**(क्रमशः)**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559